# संपादकीय

जानेवारी–फेब्रुवारी १९८१ च्या या अंकाबरोबर 'बायजा' ५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. पाचव्या वर्षाचा पहिला अंक सावित्रीबाई फुले विशेषांक असावा हा एक सुखद योगायोग. सावित्रीबाई फुल्यांनी त्यांचे पती ज्योतिबा फुले यांच्या कामात सहभागी होऊन स्त्रियांना व पददलितांना शिक्षण उपलब्ध करून दिले. स्त्रियांची व दलितांची उन्नती व्हायची असेल तर त्यांना प्रथम शिक्षण दिले पाहिजे हे ज्योतिबा फुल्यांना उमगले होते. म्हणून त्यांनी प्रथम आपल्या पत्नीला शिक्षण देऊन शिक्षिका बनविले. सावित्रीबाई फुल्यांनीही शिक्षिकेचे व्रत मनापासून स्वीकारले. स्त्रियांना विशेषतः दलित स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी त्यांना खूप कष्ट व हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. पण त्यांनी ते सारे आनंदाने स्वीकारले. फुल्यांच्या नंतरच्या काळात महर्षी अण्णासाहेब कर्वे, भाऊराव पाटील, पंजबाराव देशमुख वगैरेंच्या प्रयत्नांनी स्त्रियांना व मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. साहजिकच अधिकाधिक स्त्रिया शिकू लागल्या. अर्थार्जन करू लागल्या. स्वावलंबी बनू लागल्या. समाजकारणात राजकारणात भाग घेऊ लागल्या. स्त्रियांवरील सामाजिक–धार्मिक बंधने शिथिल होऊ लागली. स्त्रियांच्या परिस्थितीत अशा तऱ्हेने अनुकूल बदल होत असतानाही अजूनही फुले दांपत्याचे कार्य अपूर्ण राहिले आहे असे खेदाने म्हणावे लागते. १८५२ मध्ये फुल्यांनी पुण्यामध्ये स्त्रियांसाठी पहिली शाळा काढली, त्याला आता सव्वाशे वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. तरीसुद्धा मुलींच्या शिक्षणात आज अनेक अडथळे उभे असलेले दिसतात.

महागाई आणि अपुऱ्या उत्पन्नामुळे दलित–आदिवासी कष्टकरी वर्गातील स्त्री व पुरुष दोघांनाही पोटासाठी कष्ट करावेच लागतात. मुलांना शिक्षण देणे फारसे परवडतच नाही. सरकारने फी माफ केली तरी वह्या–पुस्तकांचा किंवा मुलांना जेवायला घालण्याचा खर्चही परवडत नाही अशी परिस्थिती असते. उलट घरातल्या माणसांची पोटे भरण्यास उत्पन्न अपुरे पडते म्हणून १०।१२ वर्षांच्या मुलामुलींनाही कामाला लावले जाते. त्यातल्या त्यात शक्य झाल्यास मुलांना प्रथम शिकवले जाते. कारण मुलाने शिकून चार पैसे जास्त मिळवले तर म्हातारपणी त्याचा आधार मिळतो. पण मुलगी सासरी जाणार व घरात बसून भाकऱ्या थापणार. तेव्हा तिला शिकवून काय उपयोग हाच विचार सर्वत्र आढळतो. शिवाय ती घरी राहिली तर घरकामाला, मुलांना सांभाळायला तिचा उपयोग होतो. त्यातून मुलीला शिकवायचे म्हटले तरी कित्येक खेड्यांत शाळाच नसते. असली तर २।३ इयत्ताच असतात. ज्यांना शिकणं शक्य आहे ती मुले जवळपासच्या मोठ्या गावांतल्या शाळेत रोज चालत जातात पण सध्याच्या असुरक्षिततेच्या वातावरणात मुलींना लांब शाळेला पाठवायलाही धीर होत नाही. मुलींसाठी वसतीगृहेही फार कमी आहेत. त्यामुळे शिक्षणासाठी मुलींना दुसऱ्या गावी ठेवणेही फारसे शक्य होत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ३३ वर्षे झाली तरी मुलींना सुलभपणे शिक्षण घेता येऊ नये हे खरोखर दुर्दैव म्हणावे लागेल. या दृष्टीने खेडोपाडी शाळा, मोफत शिक्षण, वह्या–पुस्तकांचा मोफत पुरवठा, मुलींसाठी वसतीगृहे यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न होणे जरूर आहे.

आत्मोन्नतीचे साधन व सामाजिक प्रबोधन घडविण्याचे हत्यार या दृष्टीने फुल्यांनी शिक्षणावर भर दिला होता. शिक्षणाने स्त्रियांचे विचार बदलतील, अंधश्रद्धा दूर होतील, त्या स्वावलंबी बनतील, त्यांचा आत्मविश्वास वाढेल, त्या समर्थ बनतील, त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होईल अशी अपेक्षा होती. पण आजसुद्धा सुशिक्षित, मिळवत्या स्त्रियांची मानसिक गुलामगिरी संपलेली नाही. अनेक सुशिक्षित स्त्रियासुद्धा अर्थार्जन करून स्वावलंबी न बनता केवळ गृहिणीपद भूषविण्यात भूषण मानतात. बारीकसारीक गोष्टीतही पुरुषांवर अगर दुसऱ्यांवर अवलंबून रहाण्याची स्त्रियांची सवय जात नाही. देवभोळेपणा, अंधश्रद्धाळूपणा कमी होण्याऐवजी वाढतच आहे. स्वतःवरील अगर इतर स्त्रियांवरील

अन्यायाची जाणीव अगर त्याविरूद्ध आवाज उठविण्याच्या आवश्यकतेची जाणीव सुशिक्षित स्त्रियांमध्येही फारशी आढळत नाही. गुलामगिरीला आणि कारकुनी वृत्तीला पोषक असे शिक्षण ब्रिटीश राजवटीत दिले जात होते. स्वतंत्र्यानंतर शिक्षणाचा साचा बदलला गेला नाही. त्यामुळे शिक्षणामुळे होणारी स्त्रीची अपेक्षित प्रगती होऊ शकली नाही. स्त्रियांचे दुबळेपण, परावलंबीपण, मानसिक गुलामगिरी दूर करू शकेल असे शिक्षण त्यांना मिळले पाहिजे. कायद्याने स्त्रियांना शिक्षणाची समान संधी दिली असली तरी प्रत्यक्षात ती त्यांना मिळत नाही. स्त्रियांसाठी तांत्रिक सोयी फारच मर्यादित आहेत. सर्व प्रकारचे शिक्षण व कामे स्त्रियांना उपलब्ध झाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास आणि त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न होण्यास निश्चितच मदत होईल.

अर्थात एवढयाने भागण्यासारखे नाही. स्त्रियांचे उन्नतीमधील अनेक सामाजिक व इतर अडसर दूर करण्यासाठी स्त्रियांना संघटित होऊन झगडावे लागेल. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीचे घरात आणि समाजात होणारे शोषण दुसऱ्याची मालमत्ता व उपभोगवस्तू म्हणून स्त्रीकडे पहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन, अर्थार्जन करताना बेकारी, कमी वेतन, निकृष्ट कामे, घरकाम व व्यवसाय असा कामाचा दुहेरी बोजा या स्वरुपात होणारी तिची पिळवणक, दारुबाजी, हुंडापद्धती, बलात्कार–अत्याचार या साऱ्याविरूद्ध तिला आता तटून उभे रहायचे आहे. सावित्रीबाई फुल्यांनी समाजाचा विरोध पत्करला, शिव्या पचवल्या, दगडधोंडे व शेणगोळयांचा मारा सहन केला, म्हणून आज समाजाचा विरोध न होता उजळ माथ्याने आपण स्त्रिया शिकू शकतो. तेव्हा पुढील पिढयांमधील स्त्रियांचे जीवन सुकर व्हावे, त्यांच्यावरील बंधने दूर व्हावीत म्हणून आज आपण प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी प्रसंगी समाजाचा रोष पत्करावा लागेल संघर्षही करावा लागेल. माणूस म्हणून आणि स्वतंत्र नागरिक म्हणून मिळणारे सर्व हक्क पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही मिळाले पाहिजेत यासाठी झगडावे लागेल. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्तीचा पाया स्त्रीशिक्षण सुरू करून फुले दांपत्याने घातलेला आहे. स्त्रीमुक्तीच्या मार्गावरील पुढची वाटचाल आपल्याला करायची आहे. अनेक सावित्रीबाई फुले निर्माण होण्याची आज गरज आहे. त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून समता व न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने सर्वांगोण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी पुढचा मार्ग आक्रमवयाचा आहे. तेव्हा आपापल्या कुवतोनुसार सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या लढयामध्ये सहभागी होण्याची प्रतिज्ञा ३ जानेवारी १९८१ या सावित्रीबाई फुल्यांच्या १५१ व्या जन्मदिनी आपण करूया आणि नव्या वर्षाची मुहूर्तमेढ रोवूया त्यासाठी एकमेकांना शुभेच्छा देऊया 'बायजा'तर्फे बायजाच्या वाचकांना, हितचिंतकांना आणि 'बायजा'च्या कार्यात सहभागी होणाऱ्या सर्वजणांना हार्दिक शुभेच्छा !

---

### विशेष सूचना

१) ज्या वर्गणीदारांची वर्गणी संपली आहे त्यांनी कृपया ताबडतोब ९ रु. पाठवून वर्गणीचे नूतनीकरण करावे. वर्गणी संपादकाच्या पत्त्यावर पाठवून.

२) वर्गणीदाराने आपले पूर्ण नाव, घराजवळची खूण, गावाचे नाव, तालुका, जिल्हा, वगैरे तपशीलवार पत्ता कळवावा. म्हणजे अंक पोस्टात गहाळ होणार नाहीत.

३) अंक मिळत नाही असे दिसल्यास ताबडतोब आमच्याशी संपर्क साधावा. अंक शिल्लक असल्यास परत पाठवला जातो. त्याच प्रमाणे पोस्टात अंक गहाळ होत आहेसे वाटल्यास पोस्टमास्तरकडे लेखी तक्रार द्यावी आणि आमच्याकडे त्याची एक प्रत पाठवावी.

४) कवितांबाबत पत्रव्यवहार करणे शक्य होत नाही. क्षमस्व.

५) 'बायजा' दोन महिन्यातून एकदा निघते याची कृपया नोंद घ्यावी.

---